# एमएमआरसीची तीन हजार वृक्ष लागवडीची मोहीम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) 'कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेतील २६ मेट्रो स्थानकांच्या बांधकामासाठी तीन हजार झाडे कापण्यात आली आहेत. एमएमआरसीने उच्च न्यायालयाला दिलेल्या हमीनुसार झाडे कापण्यात आलेल्या परिसरातच १८ इंच परिघाची तितकीच झाडे लावण्यात येणार आहेत. त्यानुसार तीन हजार वृक्षांची लागवडीला एमएमआरसीने सुरुवात केली आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांच्या हस्ते बुधवारी वृक्षारोपणाच्या मोहिमेला मेट्रो ३ च्या कामातील टप्पा १९ येथून सुरुवात करण्यात आली. सीप्झ मेट्रो स्थानक परिसरातून या मोहिमेची सुरुवात झाली. दरम्यान सीप्झ ते धारावी असा हा टप्पा असून यात १० मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.

या १० मेट्रो स्थानकांदरम्यान तीन हजारपैकी एक हजार ८५ झाडांची लागवड करण्यात येणार आहेत. पुढील तीन वर्षांमध्ये तीन हजार झाडे लावून त्यांची देखभाल मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन करणार असल्याची माहिती अश्विनी भिडे यांनी दिली. पर्यावरण संवर्धनाच्यादृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.